नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५७ /२०२६ दि. १३ /०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत कॅडबरी जंक्शन सर्व्हीस रोड येथुन नितीन जंक्शनकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर जे कुमार कंपनी कडून फ्रिवे ब्रिजचे काम सुरू असुन सदर कामा करीता सर्व्हिस रोड वर बॅरेकेटींग करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** धर्मविर कट सर्व्हीस रोड मार्गे तिन हात नाका जंक्शनकडे जाणाऱ्या बसेस, जड अवजड मालवाहतूक वाहनांना तसेच इतर सर्व वाहनांना **धर्मविर कट सर्व्हीस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व वाहने नाशिक मुंबई हायवे स्लीप रोडने तिन हात नाका जंक्शन येथून पुढे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२) वासुदेव बळवंत फडके (भक्ती मंदीर) मार्गावरुन सर्व्हीस रोडवर येणाऱ्या** सर्व प्रकारच्या वाहनांना **सर्व्हीस रोडवर डावे वळण घेण्यास 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. **३) मोदी हुंडाई कट वरुन सर्व्हीस रोडवर येणाऱ्या** सर्व प्रकारच्या वाहनांना **सर्व्हीस रोडवर डावे वळण घेण्यास 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. **४) एच.डी.एफ.सी. कट वरुन सर्व्हीस रोडवर येणाऱ्या** सर्व प्रकारच्या वाहनांना **सर्व्हीस रोडवर डावे वळण घेण्यास 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व वाहने उजवे वळण घेवुन धर्मविर कट मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि.१६/०३/२०२६ रोजी पासुन दि.३०/०४/२०२६ रोजी पर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.